श्री.शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथे अखिल भारतीय नागरी सेवा जलतरण स्पर्धा २०१७-१८ आयोजित करण्यासाठीच्या खर्चास मंजूरी.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

शासन निर्णय क्रमांक:-अभानासे-३८१७/प्र.क्र.८१/क्रीयुसे-२,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक :- ०८ मार्च, २०१८.

वाचा:-

१. केंद्रीय सिव्हिल सेवा सांस्कृतिक आणि क्रीडा बोर्ड यांचे पत्र क्र.५९/०२/२०१६-१७/ सीसीएससीएसबी , दि.१२.१२.२०१७.
२. सचिवालय जिमखाना, मुंबई यांचे पत्र क्र.अभानासे /आयोजन /जलतरण/२०१७-१८, दि.८.२.२०१८.
३. उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई विभाग ,मुंबई यांचे पत्र क्र.उपसंक्री /अभानासेस्पर्धा आयोजन /१७-१८ /का-४/५२१, दि. ०१.०३.२०१८.
४. शासन निर्णय, क्रमांक:-अनुवि४९१६/(३२/१६)/अर्थसंकल्प,दि. १२.०१.२०१८

प्रस्तावना:-

श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल,बालेवाडी, पुणे येथे सन २०१६-१७ मधील अखिल भारतीय नागरी सेवा जलतरण स्पर्धा आयोजनाकरिता आवश्यक असणाऱ्या खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

दिनांक २९ ते ३१ मार्च, २०१८ या कालावधीत श्री.शिवछत्रपती क्रीडा संकुल,बालेवाडी, पुणे येथे **अखिल भारतीय नागरी सेवा जलतरण स्पर्धा २०१७-१८** आयोजनाकरिता **रु.१०,२५,००० (रुपये दहा लाख पंचवीस हजार फक्त)** इतक्या रकमेच्या खर्चास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. तथापि सदर खर्चाच्या अधीन राहून व सचिवालय जिमखाना यांनी स्पर्धेचा अहवाल बाबनिहाय प्रत्यक्ष झालेल्या खर्चाचा तपशिल, विनियोग प्रमाणपत्र, मंजूर आदेशातील सर्व अटींची पुर्तता करण्याबाबत मा.महालेखापाल, मुंबई यांच्या कार्यालयाने काढलेल्या लेखा आक्षेपांची पुर्तता करण्याच्या अटींवर सोबतच्या **परिशिष्ट "अ"** प्रमाणे बाबनिहाय खर्च करण्यास शासनाची मंजूर देण्यात येत आहे.

सदरचा खर्च मागणी क्र.ई-३, २२०४, क्रीडा व युवकसेवा, १०४-क्रीडा व खेळ, (०६) अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धा (०६) (०५) अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेचे आयोजन (२२०४ १९९९) योजनेतर योजना या लेखाशिर्षाअंतर्गत उपलब्ध रकमेतून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०८१५२४३००४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.09 10:10:58 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई विभाग, मुंबई,
३. उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे विभाग, पुणे
४. जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई-४०० ०२१.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई /नागपूर,
७. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई /नागपूर,
८. वित्त विभाग (व्यय-११), मंत्रालय, मुंबई,
९. मानद महासचिव, सचिवालय जिमखाना,मुंबई -४०० ०३२ (५ प्रती)
१०.निवड नस्ती (क्रीयुसे-२).

परिशिष्ट "अ"

महाराष्ट्र शासनातर्फे दिनांक २९ ते ३१ मार्च २०१८ होणाऱ्या अखिल भारतीय नागरी सेवा जलतरण स्पर्धेच्या आयोजनासाठी होणाऱ्या अंदाजित खर्चाचा तपशील

अ. क्र.	तपशिल	अंदाजित खर्च
अ.	**पूर्व तयारी**	
१	अखिल भारतीय नागरी सेवा जलतरण स्पर्धा २०१७-१८ च्या आयोजनाबाबत पाहणीसाठी पुणे (महाराष्ट्र) येथे भेटी देण्याकरिता.	५,०००/-
२	अखिल भारतीय नागरी सेवा जलतरण स्पर्धा २०१७-१८ च्या आयोजनाबाबत प्रतिनिधी तसेच इतर अधिकारी यांच्यासमवेत बैठकीकरिता उपस्थित संघटनेचे पदाधिकारी यांना अल्पोपहार, चहापाणी, जेवण यावरील खर्च.	१५,०००/-
ब	**आयोजन**	
१	लेखन सामग्री, संगणक, प्रिंटर व इतर साहित्य व्यवस्था खरेदी व भाड्याकरिता येणारा खर्च.	५,०००/-
२	बॅनर , बोर्ड प्रिंटींग इत्यादी छपाई करिता होणारा खर्च.	१५,०००/-
३	स्पर्धेकरीता लागणारा टपाल खर्च फॅक्स इत्यादी.	२,०००/-
४	अ) प्रमाणपत्र (खेळाडू व स्वयंसेवक इत्यादीसाठी छपाई खर्च) ब) निमंत्रण पत्रिकेची (उदघाटन व समारोप समारंभ) छपाई खर्च व बॅचेस कूपन्स इत्यादी	१५,०००/-
५	वाहतुक खर्च. (स्पर्धकांना पुणे रेल्वे स्थानकांपासून श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल बालेवाडी येथे आणण्यासाठी वाहतुक खर्च)	५०,०००/-
६	उदघाटन समारंभ आयोजन खर्च (खुर्ची, टेबल हारतुरे/ शाल/ श्रीफळ/ अल्पोपहार/ शामियाना, इत्यादी)	४०,०००/-
७	उदघाटन व समारोप प्रसंगी तसेच स्पर्धेदरम्यान स्थिरचित्रण (केंद्र शासनाकडे नियमित अहवालासोबत पाठविण्यासाठी)	१०,०००/-
८	उदघाटन समारोह / समारोप आयोजन. खेळाडू व इतर मदतनीस यांना वाहतूक खर्च तसेच अल्पोपहार व चहा करिता येणारा खर्च.	५०,०००/-
९	मुख्य जनसंपर्क अधिकारी, स्पर्धा सचिव व स्पर्धा सह सचिव यांचेकरिता ब्लेझर	२१,०००/-

१०	मानधन व प्रवासखर्च (जलतरण पंच व मदतनीस इत्यादी)	६०,०००/-
११	आयोजन समिती, प्रमुख संपर्क अधिकारी, पंच, वार्ताहर, अम्पायर, मदतनीस, डॉक्टर, टेकिनिकल, स्टाफ इ. साठी (सकाळी/संध्याकाळी) चहा व अल्पोपहार तसेच भोजन व्यवस्थेकरीता खर्च.	७२,०००/-
१२	आयोजनासाठी उपस्थित अम्पायर, आयोजक, मदतनीस यांच्याकरिता टीशर्ट /कॅप ६०x४००.	२४,०००/-
१३	प्रथोमोपचार	५,०००/-
१४	क्रिडा साहित्य आयोजनाकरिता (स्टॉप वॉच, फ्लॅग व बोर्ड इ.)	१०,०००/-
१५	सर्व खेळाडू ,अधिकारी, व पंच यांना स्मृतीचिन्ह (प्रत्येकी २५० प्रमाणे ६८४ व्यक्तीकरीता)	१,७१,०००/-
१६	हाय-टी (सर्व खेळाडू, पंच,निमंत्रीत, स्वयंसेवकाकरीता हाय टी)	२,५२,०००/-
१७	उदघाटन व समारोप कार्यक्रमासाठी उपस्थीत राहणाऱ्या मा. मुख्य अतिथी, क्रीडा अधिकारी, असोसिएशन, दिल्ली क्रीडा बोर्डाचे अधिकारी यांना स्मृती चिन्ह	२५,०००/-
१८	श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथून खेळाडूंना पुणे रेल्वे स्थानक येथे सोडण्यासाठी वाहतूक खर्च, किंवा इतर ठिकाणांकरिता सोडण्याकरिता येणारा खर्च.	६०,०००/-
१९	किरकोळ खर्च.	१०,०००/-
२०	श्री शिव छत्रपती क्रीडा संकुलातील जलतरण तलावाचे भाडे.	५०,०००/-
२१	२ खोल्या ८ दिवसाकरिता ऑफीस व पदाधिकाऱ्यांकरीता प्रतिदिन रु. ५००/- प्रमाणे	८,०००/-
२२	२० खोल्या ५ दिवसाकरिता आयोजन समिती, पंच, स्वयंसेवक यांच्यासाठी प्रतीदिन रु. ५००/- प्रमाणे	५०,०००/-
	एकूण :-(रु. दहा लाख पंचवीस हजार फक्त)	१०,२५,०००/-

टिप :- श्री शिव छत्रपती क्रीडा संकुलातील वास्तव्याकरीता प्रती रुम प्रती दिन रु.५००/- या दराने खेळाडूंकडून भाडे घेण्यात येईल व ते श्री शिव छत्रपती क्रीडा संकुलास अदा करण्यात येईल. केंद्र शासनाच्या परिपत्रकानुसार खेळाडूंना वास्तव्य Payment Basis वर करण्यात येईल.

Rajendra
Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.09 10:11:11 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन